Impact Factor - 6.261 ISSN - 2348-7143
INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL
February - 2019 Special Issue – 115 (B)

# India : Yesterday, Today & Tomorrow

# भारत : काल, आज आणि उद्या



**Guest Editor :**
**Dr. A. B. Nikumbh**
**I/C Principal,**
**S.S.G.M. Science, Gautam Arts &**
**Sanjivani Commerce College,**
**Kopargaon, Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar**

**Executive Editors of the issue :**
**Prof. R. S. Zarekar**
**Prof. G. S. Vidhate**
**Prof. S. A. Hon**
**Dr. M. E. Auti**

**Chief Editor :**
**Dr. Dhanraj Dhangar (Yeola)**

This Journal is indexed in :
- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN : 2348-7143
February-2019

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February -2019 Special Issue – 115 (B)

## India : Yesterday, Today & Tomorrow
## भारत : काल आज आणि उद्या

**Guest Editor:**
Dr. A. B. Nikumbh,
I/C Principal,
S.S.G.M. Science, Gautam Arts & Sanjivani Commerce College,
Kopargaon, Tal. Kopargaon, Dist. Ahmednagar

**Executive Editor of the issue:**
Prof. R. S. Zarekar
Prof. G. S. Vidhate
Prof. S. A. Hon
Dr. M. E. Auti
Dr. B. M. Waghmode
Prof. M. V. Kulkarni
Dr. Miss. Y. M. Bhilore
Ptof. Mrs. P. S. Dhanwate

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 800/-

| | | |
|---|---|---|
| 33 | मानवाधिकारांची वंचितता सबलीकरण आणि स्त्रीवादी चळवळ डॉ.बेग रेहानाआरा ईस्माइल | 139 |
| 34 | सत्यशोधक समाज भारतातील पहिली ब्राम्हणेत्तर लोक चळवळ प्रा.सचिन ओवाळ | 143 |
| 35 | ईस्ट इंडिया कंपनी कालीन अहमदनगर जिल्ह्याची न्यायदान व्यवस्था : १८१७ ते १८३५ राणी केदार | 146 |
| 36 | नविन आर्थिक सुधारणांचा भारताच्या कृषि निर्यातीवरील परिणाम श्रीमती स्वप्नाली खांडरे व डॉ.आर.डी.भोसले | 151 |
| 37 | भारतातील पुरोगामीत्वाची वाटचाल : स्थिती आणि गती प्रा.किरण पवार | 154 |
| 38 | भारत – पाकिस्तान फाळणीनंतर भारतापुढे निर्माण झालेल्या समस्या प्रा.योगेश शिंदे | 159 |
| 39 | भारतीय लोकशाही डॉ.बाबसाहेब पवार | 163 |
| 40 | भारत काल,आज आणि उद्या डॉ.मेघराज औटी | 165 |
| 41 | छ.शिवाजी महाराजांचे प्रारंभीचे सहकारी : कान्होजी जेधे डॉ.उज्वला नलावडे | 169 |
| 42 | भारतीय शासनसंस्थेची बदलती भूमिका प्रा.अंकुश सूर्यवंशी | 173 |
| 43 | २१ व्या शतकातील भारतासमोरील आव्हाने महादेव चिंदे | 177 |
| 44 | प्रादेशिक पक्ष आणि भारतातील राजकारण अमोल बंद्रे | 181 |
| 45 | भारत : एक भावी महासत्ता – लष्करी व परराष्ट्रीय संदर्भ प्रा. विशाल पोटे | 185 |
| 46 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे आधुनिक काळातील महत्त्व प्रा. पूजा धनवटे | 190 |
| 47 | नर्मदा बचाव आंदोलन कु. रोहिणी डिबरे, वैष्णवी चौधरी, पल्लवी हाडोळे, गोकुळ जाधव | 192 |
| 48 | जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम प्रा. जी. बी. कानवडे व एस. बी. बिडवे | 194 |
| 49 | Democracy and Regional Political Parties in Maharashtra Prof. A. M. Rakh | 197 |


*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the p on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the paper responsible for originality of the papers and intensive thoughts in the papers. Nobody can repu these papers without pre-permission of the publisher.*

***- Chief & Executive Edito***

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

# मानवाधिकारांची वंचितता, महिला सबलीकरण आणि स्त्रीवादी चळवळ

डॉ. बेग रेहानाआरा ईस्माइल
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग
श्री पद्ममणि जैन महाविद्यालय पाबळ

भारतीय समाज व्यवस्थेत मानवी हक्कांना विशेष महत्व दिसून येते. लोकशाही शासनप्रणालीमध्ये राज्यघटना,प्रशासन, समता,बंधुता,स्वातंत्र्य,न्याय या तत्वांना महत्व असले तरी अलीकडील काळात ही लोकशाही मुल्ये पाळली जातात का? हे तपासणे महत्वाचे आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्राच्या सनदेमध्ये मानवी हक्कांचा आग्रह धरण्यात आला. समाजात स्त्री–पुरूष या दोन जाती मानल्या तर त्यांचा धर्म मानवता मानला पाहिजे परंतु प्राचीन कालखंडापासून स्त्रिया सामाजिक व कौटुंबिक अन्यायाच्या बळी ठरलेल्या आहेत. भारतीय समाजाने स्त्रीलातीच्या नैसर्गिक हक्कांपासून वंचित ठेवले आहे. स्त्री पुरूषसत्ताक पध्दतीच्या ओझ्याखाली दबली आहे तिचे नैसर्गिक अधिकार देखील नाकारले जात आहेत. भारतीय राज्यघटनेने वंश,लिंग,भाषा,धर्म या आधारावर भेदभाव न करण्याचे ध्येय ठेवले आहे. स्त्रियांचा छळवाद अनेक गोष्टीमधून झालेला दिसून येतो. उदा.. हुंडापध्दत, पुरूषप्रधान समाजव्यवस्था, विवाहासंबंधीच्या प्रथा, परंपरा, सामाजिक प्रतिष्ठा, कौटुंबिक आर्थिकस्थिती, दारिद्र्य, स्त्री एक उपभोग्य वस्तू मानणे इत्यादि अनेक समस्या स्त्रियांबाबत दिसून येतात स्त्री कडे माणूस म्हणून पाहण्याचा दृष्टीकोन तयार झाला पाहिजे. स्त्रीला देखिल आपल्या हक्कांची व कर्तव्याची जाणीव होणे अपेक्षित आहे. मागासलेपण आणि मानसिक दुर्बलता स्त्रीला आपल्या हक्कांपासून दूर ठेवते.

१९७५ नंतर स्त्री–पुरूष समतेचा विचार सुरु झाला स्त्री प्रश्नांना महत्व दिले जावू लागले सामाजिक,सांस्कृतिक जीवनात स्त्रीला सामावून घेण्याची प्रक्रिया सुरू झाली. भारतात स्त्री आपल्या हक्कांपासून वंचित राहिली या कारणांमध्ये महत्वाचे कारण असे दिसते की, भारतात असलेली पुरूषसत्ताक समाजव्यवस्था, अनेक धार्मिक अनिष्ट चालीरीतींचा परिणाम स्त्री जीवनावर झाला. या रूढी परंपरांनी स्त्रीचा एक माणूस म्हणून जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे. धर्मभोळी स्त्री आपले अस्तित्व आपल्या कुटुंबाच्या सहअस्तित्वात मिसळून टाकते. आपल्या भावनांना काबूत ठेवते आणि दबलेल्या अवस्थेत समाजात वावरत राहाते परिणामी तिचे नैसर्गिक हक्क डावलले जातात. स्त्री पुरूष अहंकाराला बळी पडते आणि स्त्रीच्या मानसिकते कडे कोणाचे लक्ष जात नाही. स्त्रीला समाजात सन्मानाने जगता आले पाहिजे त्यांना त्यांच्या हक्कांपासून उपेक्षित ठेवून चालणार नाही याची जाणीव समाजाला होणे गरजेचे आहे. एकोणिसावे शतक हे स्त्री सुधारणेचे शतक म्हटले जाते. राजाराम मोहन रॉय, महात्मा फुले, इ. विविध समाजसुधारकांनी स्त्री सुधारणेचे कार्य केले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदु कोड बिलामध्ये स्त्रियांच्या मुलभुत हक्कांविषयी विचार मांडले आहेत. मानवी इतिहासात मानवाधिकारासाठी लढणारे अनेक महान विभूती होवून गेल्या आहेत. भगवान बुध्द ते थॉमसपेन, महात्मा फुले ते मार्टिन ल्युथर किंग आणि कार्ल मार्क्स ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पर्यंतचा प्रवास हा मानवी हक्क संघर्षाने भरलेला दिसून येतो. धर्म,वंश,भाषा,जात,लिंग इत्यादिच्या आधारावर भेदभाव होतो. स्त्रियांचे या सर्व पातळयांवर शोषण होत असते. मुख्यत: ती स्त्री आहे या कारणावरूणच तिचे शोषण होत असते स्त्रियांचे अज्ञान, मागासलेपण हया समाजाच्या प्रगतीच्या मार्गातील अडसर ठरत आहेत. महिला विकासाशी फक्त स्त्रियांचा नव्हे तर तिच्या कुटुंबाचा, समाजाचा एवढेच नव्हे तर राष्ट्राच्या विकासाचा प्रश्नही निगडित झाला आहे.

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

एवढया व्यापक दृष्टीकोनातून स्त्री प्रश्नाचा विचार होणे, अभ्यास होणे आवश्यक आहे. स्त्रीची अशी दयनिय अवस्थाही संपूर्ण जागतिक पातळीवर दिसते. दुसऱ्या महायुध्दानंतर स्त्रियांवरील सामाजिक व धार्मिक निर्बंध काहीसे ढिले पडू लागले आहेत. अर्थाजनासाठी स्त्री घराच्याबाहेर पडू लागली आहे. स्त्री काही प्रमाणात आर्थिकदृष्टया स्वावलंबी झाली आहे. मात्र स्त्री–पुरूष समतेचे तत्व समाजात रूजू शकले नाही. स्त्रियांना दुय्यम लेखण्याच्या पुरूषीवृत्तीत फारसा फरक पडला नाही. स्त्री–पुरूष समता आणि स्त्री हक्काचे रक्षण तसेच त्यांच्या समस्या दूर करण्याच्या उद्देशाने महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. भारतीय स्त्री जीवनात सर्वजाती धर्मांच्या स्त्रियांचा समावेश होतो धार्मिक ग्रंथांचा आधार घेतल्यास स्त्रीला अनेक अधिकार आहेत, चांगला दर्जा आहे परंतु आज मात्र धर्माचा चुकीचा अन्वयार्थ आपल्या सोयीने जावून तिची पिळवणूक होतांना दिसत आहे.

महिला हक्कांसंबंधी राज्यघटनेतील तरतुदी– भारतीय राज्यघटनेत महिलांच्या हक्कासंबंधी अनेक महत्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. राज्यघटनेच्या सरनाम्यात सासमाजिक,आर्थिक,राजकीय न्यायाची हमी देण्यात आली आहे. राष्ट्रीय आंदोलनाने स्त्री–पुरूष समानतेच्या मुल्याला विशेष महत्व दिले आहे. या मुल्यांचा घटनाकारांनी योग्य आदर ठेवून महिलांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी संविधानात अनेक तरतुदी केल्या आहेत. मुलभुत हक्क,मार्गदर्शक तत्वे, मुलभुत कर्तव्ये,प्रौढमताधिकार याव्दारे स्त्री–पुरूष समानतेचे तत्व स्विकारले आहे. धर्म,वंश,जात,जन्मस्थान,वास्तव्य,लिंग यावरून कोणताही भेद पाळला जाणार नाही याची हमी दिली अ हे. ७३ आणि ७४ व्या घटनादुरूस्तीने १९९३ मध्ये पंचायतराज पध्दतीचा स्विकार करून महिलांना १/३ जागा राखीव ठेवण्यात आल्या. या तरतुदीमुळे महिलांच्या राजकीय सबलीकरणाचे उद्दीष्टये साध्य करण्याच्या दिशेने महत्वाचे पाऊल टाकले आहे. उच्च घटनात्मक अधिकार पदे महिलांसाठी खुली आहेत. राष्ट्रपतीपद,पंतप्रधानपद,सर्वोच्च,उच्च न्यायालयाचे सरन्यायधिश,मुख्य न्यायाधिश,मुख्य निर्वाचन आयुक्त इत्यादी सर्व महत्वाची घटनात्मक अधिकारपदी महिला येवु शकतात. महिला राजकीय,प्रशासकीय सबलीकरणाच्या दृष्टीने ही महत्वाची तरतूद आहे.

RESEARCHJOURNEY

महिलाभिमुख कायदे – स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय संसदेने महिलांच्या कल्याणासाठी आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी अनेक महत्वाचे कायद संमत केले आहेत. १) अनैतिक व्यापार (प्रतिबंध)कायदा १९५६, २) मातृत्व लाभ कायदा १९६१, ३) हुंडाबळी कायदा १९६१, ४) स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन (प्रतिबंध) १९८६,५) राष्ट्रीय महिला आयोग कायदा १९९०, ६) कौटुंबिक हिंसाचारापासून स्त्रियांचे संरक्षण कायदा २००५, ७) बालविवाह बंदी कायदा २००६ इत्यादी. याशिवाय महिलांशी संबंधित असलेल्या अनेक तरतु इतर अनेक कायदयांत आहेत ज्यातून महिलांच्या हक्कांचे सेरक्षण होत उदा. हिंदु विवाह कायदा, हिंदु वारसा हक्क कायदा, कुटुंब न्यायालय कायदा इत्यादी.

महिला सबलीकरण योजना–महिला सबलीकरणाचे उद्दिष्टे व महत्व लक्षात घेवून केंद्रशासन आणि विविध राज्य शासनाने महिला सबलीकरणाच्या धोरणाला अग्रक्रम दिला. विविध उपक्रम हाती घेतले उदाहरणार्थ महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम –१९८७, स्वयंसिध्दा, स्वशक्ती, स्वाधार, बालिका समृध्दी योजना, तात्पुरती निवासगृहे, कुटुंब सल्ला केंद्रे, स्त्रियांसाठी वसतीगृहे, अल्पमुदतीचे महिलांसाठी अभ्यासक्रम इत्यादी. केंद्रसरकारने २००१ मध्ये महिला सबलीकरणाचे राष्ट्रीयधोरण जाहीर केले. यातुन महिला सबलीकरण व विकास घडवून आणणे,महिलां विरूध्द करण्यात येणारा भेदभाव दूर करणे, जीवनाच्या सर्व क्षेत्रात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविणे हा उद्देश होता. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची माहिती घेणे या सारखा एक राष्ट्रीय कृती कार्यक्रम देखिल निश्चित केला गेला. १९९० च्या राष्ट्रीय महिला आयोग कायदयांतर्गत भारत सरकारने

ISSN : 2348-7143
February-2019

१९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची स्थापना केली. या आयोगा मार्फत महिलांच्या संरक्षणासाठी घटनात्मक व कायदेशीर तरतुदींचे अध्ययन करणे, महिलांच्या तक्रारींचे निवारण करणे इत्यादी कार्ये होवू लागली. महाराष्ट्र शासनाने देखिल महिलाभिमुख धोरणाचा स्विकार केला. महाराष्ट्राने नेहमीच आधुनिक आणि पुरोगामी विचारांचा पाठपुरावा केला आहे. अनेक सुधारणावादी चळवळींची सुरवात महाराष्ट्रात झाली असल्याचे ऐतिहासीक पुरावे आहेत. साहजिकच महिला सबलीकरण, महिला–बाल कल्याण विभाग,राज्य महिला आयोग, महिलांविषयक पुरोगामी धोरण इत्यादी बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर असलेले दिसते. महाराष्ट्र शासनाने अनेक योजना महिला विकासाच्या दृष्टीने घोषीत केल्या आहेत. त्यांची परिणामकारकरित्या अंमलबजावणी होत आहे. उदा. जिजामाता महिला आधार योजना, ग्रामीण महिला व बालकांचा विकास कार्यक्रम, माहेर योजना, सावित्रीबाई फुले दत्तक योजना, आहिल्याबाई होळकर योजना; देवदासी पुनर्वसन योजना, महिला मंडळांना सहाय्यक अनुदान योजना याव्दारे महिलांना आधार देणाऱ्या योजना राबविल्या आहेत. परंतु तरीही महिला सबलीकरणाची प्रक्रिया देश–राज्यपातळीवर पूर्ण झाली असे म्हणता येत नाही. लिंग समानतेचे तत्व पूर्णत्वाने स्विकारण्यास वेळ जाणार आहे कारण स्त्रियांविषयी समाजाच्या मानसिकतेत काही फारसा बदल झालेला नाही. भारतीय समाज आजही २१ व्या शतकात रूढी,परंपरांच्या गर्तेतून बाहेर आलेला नाही. कायदेमंडळात महिलांना एक तृतियांश आरक्षण देण्याच्या प्रश्नाबाबत भारतीय राज्यकर्त्यांची नकारात्मक भूमिका याचेच एक उत्तम उदाहरण आहे.

फ्रान्स मधील क्रांती १७८९, अमेरिकन संविधान आणि भारतीय संविधानातून मानवी मुलभुत हक्कांची प्रेरणा मिळते मानवी हक्काच्या रक्षणार्थ आंतरराष्ट्रीय करारांचा उपयोग नेहमीच केला आहे. धार्मिक अल्पसंख्यांकाच्या रक्षणार्थ केलेला सर्वात प्राचीन करार म्हणजे वेस्टफालियाचा शांतता करार–१६४८ होय. जर्मनीतील रोमन कॅथॉलिक व प्रोटेस्टंट पंथाच्या लोकांना समान वागणूक देण्याचे मान्य झाले. १९ व्या शतकात गुलामी नष्ट करणारे करार करण्यात आले. १९२६ मध्ये राष्ट्रसंघाच्या आमसभेत आंतरराष्ट्रीय गुलामगीरी नष्ट करणारा करार केला गेला. मानवी हक्कांच्या रक्षणार्थ जे अनेक ठराव करण्यात आले त्यांचा हेतु व्यक्तीला आपल्या हक्कांचे रक्षण करण्याची क्षमता देण्याचा आहे. गुलामगिरी,वेठबिगार, वर्णभेद इत्यादी वर बंदी घालणारे ठराव संमत झाले आहे. भारतीय संविधानाने समाजातील दुबळे घटक, अल्पसंख्याक, स्त्रिया यांच्याबाबत विशेष जबाबदारी शासनावर टाकली आहे. यातूनच महिलांच्या मानवी अधिकारांचे रक्षण होवून महिलांचे सबलीकरण होण्यास मदत होवू शकते.

सारांश– समाजात रूजलेल्या लिंगभेदानुसार स्त्रियांना पुरूषापेक्षा दुय्यम स्थान मिळाले आहे. स्त्रियांवर मोठया प्रमाणात अन्याय व अत्याचार होत आहेत. कायदयाने स्त्रियांना समान लेखले असले तरी पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्रियांच्या वाटयाला आगतिकता आली अशा स्त्रिया हक्कासाठी स्त्रीवादी चळवळी, आयोगामार्फत लढा देतांना दिसतात. स्त्रियांना सर्व क्षेत्रात पूर्ण व समान अधिकार असावेत, लैगिक छळ,शोषण, स्त्रियांची अडवणूक यासर्व गोष्टींचे व लिंगभेदाचे निराकरण झाले पाहिजे, स्त्रियांना मानसिक व शारिरीक आरोग्याची शाश्वती दयावी, सर्व क्षेत्रात सहभाग घेण्याविषयीची माहिती स्त्रियांना दयावी, शिक्षणाची समान संधी त्यांना मिळावी, सर्व क्षेत्रात निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य स्त्रियांना असावे, कुटुंबातील महिलांना प्रोत्साहन देणे, महिलांना त्यांच्या मानवी हक्कांची जाणिव निर्माण करून देणे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे, महिलांवरील अत्याचारासाठी गुन्हेगारास कठोर शिक्षेची कारवाई करणे, प्रशासनात महिलांचे प्रमाण वाढविणे इत्यादी उपाय योजनाकेल्यास महिलांचे सबलीकरण होण्यास निश्चितच मदत होइल आणि देशाच्या प्रगतीसाठी,

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 115 (B)- भारत : काल आज आणि उद्या
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
February-2019

मताधिकारासाठी, महिला आरक्षण, दुर्बल घटकांना आरक्षण, माहितीचा अधिकार इत्यादी तरतुदींचा फायदा महिलांना घेता येवू शकतो. ती क्षमता त्यांच्यात निर्माण होवू शकते.

संदर्भ सूची –

१. पंडित नलिनी – साधना, महाराष्ट्रातील स्त्री दास्य विमोचनाची चळवळ २००७
२. रेगे शर्मिला – स्त्रीमिती, मिळून साऱ्याजणी, स्त्री असलेली, घडवलेली व दाखविलेली
३. पाटील व्ही. बी. – मानवी हक्क
४. खैर धनंजय, ठोंबरे शिवाजी – मानवाधिकार चळवळ– एक मुक्त चिंतन
५. साळुखे आ. ह. – हिंदु संस्कृती आणि स्त्री. १९९३

SHRI PADMAMANI JAIN COLLEGE Pabal Tal.Shirur, Dist.Pune.
RESEARCHJOURNEY
PRINCIPAL
Shri Padmamani Jain
Arts & Commerce College
Pabal,Tal.Shirur,Dist.Pune.412403